लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# ‘सांडपाणी प्रक्रिया हे औद्योगिक क्षेत्रासमोरचे आव्हान’

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** सीएसआयआर-नीरीच्या वतीने नीरीच्या सभागृहात सोमवारी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वडोदरा एन्व्हायरो चॅनल लिमिटेडचे माजी व्यवस्थापकीय संचालक सतीश पांचाळ होते. तर सीएसआयआर-नीरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य यावेळी उपस्थित होते.

सध्याच्या युगात उद्योग आणि समाज या दोन्हीसाठी तंत्रज्ञानाच्या विकासाचे महत्त्व सांगताना सतीश पांचाळ यांनी सांडपाणी प्रक्रिया हे औद्योगिक क्षेत्रासमोरचे महत्त्वाचे आव्हान असल्याचे सांगितले. सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापराच्या महत्त्वपूर्ण भूमिकांवर भर देत, त्यांनी भावी पिढ्यांसाठी जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यासाठी वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

> **उद्योग आणि समाजाच्या फायद्यासाठी संशोधन आणि विकासाऐवजी संशोधन, विकास आणि प्रात्यक्षिक या तत्त्वाचे पालन करण्याचा सल्ला सतीश पांचाळ यांनी शास्त्रज्ञांना दिला.**



देशाच्या विविध भागांतील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांच्या संचालन आणि देखभालीबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. डॉ. अतुल वैद्य यांनी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. त्यांनी पर्यावरण तंत्रज्ञानाच्या विकासात नीरीचे माजी संचालक प्रा. पी. खन्ना यांच्या योगदानावरही प्रकाश टाकला.

डॉ. कविता गांधी, सीएसआयआर-नीरीच्या सीनियर प्रिन्सिपल सायंटिस्ट, यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. सीएसआयआर-नीरीचे वरिष्ठ मुख्य शास्त्रज्ञ प्रकाश कुंभारे यांनी आभार मानले.